# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. १९५ /२०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना परिपत्रक क्र. १६८/२०२२ संदर्भ क्र. सीसीओ/१७५५, दि. ०८/०६/२०२२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करिता स्थानिक निवड समितीमार्फत तदर्थ (Adhoc)/तासिका तत्वावर (CHB) नेमणूक करण्यात येणाऱ्या अध्यापकांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करण्याबाबत तसेच पुढे परिपत्रक क्र. ३१३/२०२२, जा. क्र. सीसीओ/४२३७, दि. २०/१०/२०२२ अन्वये दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरून विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालयांत शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करिता नेमणूक करण्यात आलेल्या तदर्थ/तासिका तत्वावरील अध्यापकांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव या विभागास प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या असल्याने सदर त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संबंधित महाविद्यालयास कळवूनही त्यांनी त्रुटींची पूर्तता अद्यापही केलेली नसल्याने सदर प्रस्तावांवर मान्यतेची कार्यवाही करता येत नाही.

विद्यमान शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीता विद्यापीठाने निर्गमित केलेले परिपत्रक क्र. १०२/२०२३ जा. क्र. सीसीओ/१६२३, दि. ०६/०६/२०२३ नुसार विहित पध्दतीचा अवलंब करून तसेच स्थानिक निवड समितीमार्फत कायमस्वरूपी/तदर्थ (Adhoc)/तासिका तत्वावर (CHB) नेमणूक करण्यात आलेल्या अध्यापकांचे बहुसंख्य प्रस्ताव मान्यतेसाठी विद्यापीठाकडे प्राप्त झालेले असून त्यावर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

तथापि, शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करीता मान्यतेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या त्रुटींची पूर्तता महाविद्यालयांकडून अद्यापही झालेली नसल्याने त्यावर कार्यवाही करून सदरचे प्रस्ताव अभिलेखागृह (गोदाम) विभागात स्थलांतरित करणे अडचणीचे ठरत आहे.

प्राप्त आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांकडून अद्यापही शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करीता मान्यतेसाठी प्राप्त झालेल्या शिक्षक मान्यता प्रस्तावांवरील त्रुटींची पूर्तता करण्यात आलेली नाही अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी सदरचे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसहित त्रुटींची पूर्तता करावी अन्यथा सदरचे प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

Rab 5/9/2023

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७. )
जावक क्र. सीसीओ/ 2811 )
दि. 05/09/2023 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता कक्ष)

प्रत :
१) मा. प्राचार्य/संचालक, सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था